# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक १४ मार्च, २०१८ / फाल्गुन २३, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री**<br>**(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**<br>**(३) पर्यावरण मंत्री**<br>**(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २९**

---

## अमरावती शहरात तसेच जिल्हयात घरगुती गॅसचा होत असलेला अवैध वापर

**(१) * ११०५८० प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात तसेच जिल्हयात घरगुती गॅसचा वापर जनरेटर व झेरॉक्स केंद्र चालविण्यासाठी तसेच अवैध वाहतुक करणाऱ्या वाहनांकरिता करण्यात येत असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील घरगुती गॅसच्या अवैध वापराबाबत पुरवठा विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अमरावती शहरात तसेच जिल्ह्यात घरगुती गॅसचा वापर जनरेटर व झेरॉक्स केंद्र चालविण्यासाठी होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, दि.३१.१.२०१८ रोजी अमरावती शहरात गॅस सिलिंडरमधून प्रवासी ऑटोरिक्षामध्ये गॅस भरतांना निदर्शनास आल्याने ७ सिलिंडर व १ रिफीलिंग मशीन जप्त करण्यात आली. संबंधितांवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देऊळगावराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील तसेच इरला (ता.जि.बुलडाणा) येथील व्यायाम शाळांची चौकशी करण्याबाबत

**(२) * १०६८८१ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील कागदोपत्री सुरु असलेल्या व्यायामशाळा व सार्वजनिक वाचनालयाची चौकशी करुन दोषी संस्था चालकांविरुध्द चौकशी करण्याची मागणी तहसिलदारांकडे दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मौजे इरला (ता.जि.बुलडाणा) येथे आदर्श क्रीडा, सांस्कृतिक, जनजागृती ग्रामविकास बहुउद्देशिय मंडळ या संस्थेने सन २०१०-२०११ मध्ये व्यायाम शाळेसाठी २ लक्ष रूपये अनुदान घेवून प्रत्यक्षात कोणतेही काम न करता गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

जिल्हा क्रीडा अधिकारी, बुलढाणा यांनी सदर संस्थेच्या व्यायामशाळेची प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केली असता संबंधित संस्थेने व्यायामशाळेचे बांधकाम केलेले दिसून आले आहे. त्यानुसार सदर संस्थेने व्यायामशाळा बांधकाम पूर्ण असल्याचे प्रतिवेदन इरला येथील सरपंच व ग्रामसेवक यांच्या स्वाक्षरीने जिल्हा क्रीडा अधिकारी, बुलढाणा यांना सादर केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील पाणीटंचाई निवारणाबाबत

**(३) * १११२०० श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील दरवर्षी गोपाळवाडी, सुकणी, दिघोळ देशमुख, असराची वाडी, मुसळेवाडी, हारवाडी येथे पाणीटंचाई भासत असल्यामुळे सार्वजनिक पाणीपुरवठा विहीर खोदकाम व पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत भूजल सर्वेक्षण विभाग व पाणीपुरवठा विभाग, गटविकास अधिकारी यांनी संयुक्त पाहणी करून उपाययोजना करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (लातूर ग्रामीण) यांनी रेणापूर तहसील कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत गट विकास अधिकारी, रेणापूर यांच्याकडे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.
(२) मौजे गोपाळवाडी येथे यापूर्वी सार्वजनिक विहिर मंजूर असून त्याचे काम प्रगतीपथावर आहे. मौजे सुकणी व दिघोळ देशमुख या गावांना अस्तीत्वातील पाणी पुरवठा योजनांमधून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

उर्वरित असराची वाडी, मुसळेवाडी व हारवाडी या ग्रामपंचायतींना सार्वजनिक पाणी पुरवठा विहिरीचे प्रस्ताव पंचायत समितीकडे सादर करण्यासाठी कळविण्यात आले आहे. तसेच या गावांच्या संभाव्य पाणी टंचाई निवारणार्थ त्यांचा सन २०१७-१८ च्या टंचाई कृती आराखडयामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील गावांचा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना टप्पा-२ मध्ये समावेश करण्याबाबत

**(४) * १११८९६ श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा (जि. जळगाव) तालुक्यातील लासूर व ८ गांवे-प्रा.पा.पु.योजना, वढोदा व ३ गावे- प्रा.पा.पु. योजना, गोरगावले बु., व धानोरा या गावांचा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना टप्पा-२ मध्ये समावेश करण्यात यावा याबाबतचा प्रस्ताव अध्यक्ष, मु.ग्रा.पे.का.व्यवहार्यता समिती तथा अधिक्षक अभियंता, म.जी.प्रा.मं.नाशिक यांनी कक्ष अधिकारी (पा.पु. १९), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेषतः लासूर व ८ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेंतर्गत असून लासूर या गावात विंधन विहीरीतील पाण्यामध्ये क्षाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळल्यामुळे गावकऱ्यांमध्ये गुडघेदुखी, पोटदुखी, किडनीच्या विकाराचे प्रमाण वाढत असून किडनीच्या आजाराने लासूर या गावात दरवर्षी किमान २० ते २५ लोकांचा मृत्यू होतअसल्याने सदर प्रस्ताव मंजूर करावा अशी मागणी करणारे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांना दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार उपरोक्त मागणी व प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) होय.

(३) राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम टप्पा-२ राबविण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ (जि.चंद्रपूर) वनसडी या संस्थेच्या व्यायामशाळेच्या बांधकाम अनुदानात झालेला गैरव्यवहार

**(५) * १०५४६० श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ (जि.चंद्रपूर) वनसडी या संस्थेच्या व्यायामशाळेच्या बांधकामात बनावट कागदपत्रांद्वारे अंदाजे २ लक्ष रुपयांचे अनुदानात गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ, वनसडी या संस्थेच्या संस्थाचालकाविरुद्ध जिल्हा क्रीडा विभागाने वसुलीची नोटीस बजावलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासकीय युवा धोरण सन २०१३-१४ अंतर्गत गडचिरोली जिल्ह्यासह चंद्रपूर जिल्हा व राज्यातील अन्य जिल्हे तसेच विरसावरकर भोयगाव, तुळजाभवानी वनसडी, श्रीराम शिक्षण संस्था पिपर्डा या संस्थेने बनावट कागदपत्रांव्दारे व उपरोक्त जमिनीवर बांधकाम न करता शासनाचे अनुदान प्राप्त केले, हे ही खरे आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ वनसडी या संस्थेसह अन्य संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपूर यांनी सदर संस्थांच्या व्यायामशाळेची तपासणी / पाहणी केली असता संस्थांनी व्यायामशाळेचे बांधकाम केलेले आढळून न आल्यामुळे तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळ वनसडी या संस्थेस दिनांक २६.१२.२०१७ व श्रीराम शिक्षण संस्था, पिपर्डा, ता.कोरपना, संत रामराव महाराज, सेवादासनगर, ता.जिवती, अभिषेक ग्रामविकास संस्था, पिटीगुडा, ता.जिवती, स्वातंत्र्यवीर सावरकर शिक्षण प्रसारक मंडळ, भोयगांव, ता.कोरपना या संस्थांना दिनांक २०.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपूर यांनी १८% व्याजाने अनुदानाची रक्कम शासनास चलनाद्वारे भरण्याकरिता कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### श्रीक्षेत्र माहूर येथील राष्ट्रकुट कालिन पांडव लेण्याच्या दुरावस्थेबाबत

**(६) * ११४१०५ श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीक्षेत्र माहूर (जि.नांदेड) येथील ऐतिहासिक पांडव लेणी दिनांक १२ जानेवारी, १९५३ रोजी वा त्या सुमारास औरंगाबाद पुरातत्व विभागाच्या ताब्यात दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९५३ पासून पुरातत्व विभागाकडून या पांडव लेण्यांचा कोणताही विकास करण्यात आला नसल्यामुळे लेण्यांची अत्यंत दुरावस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर लेणीच्या जतन व विकास कामांचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास शासनाकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता केव्हापर्यंत देण्यात येणार आहे,

(४) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पांडव लेण्यांच्या विकासकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांच्याकडून सदर लेणीच्या जतन व विकास कामाचे अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहराजवळील नासर्डी व नंदिनी नदीत रसायनयुक्त पाणी सोडले जात असल्याबाबत

**(७) * ११३०८५ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहराजवळील नासर्डी व नंदिनी नदीपात्रात गेल्या काही वर्षात मोठया प्रमाणात रासायनिक पाणी, भूमिगत गटाराचे पाणी, कचरा इत्यादी थेट टाकला जात असल्याने नदयांचे मोठया प्रमाणात प्रदूषण होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नदयांमध्ये रसायनयुक्त पाणी सोडल्याबाबतची तक्रार नाशिक महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्हयातील अंबड औद्योगिक वसाहतीतील सीईटीपी प्रकल्प पर्यावरण विभागाच्या परवानगीविना प्रलंबित असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदर प्रदूषणावर प्रतिबंध घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली, तसेच सीईटीपी प्रकल्पाच्या सर्व परवानग्या घेवून सदर प्रकल्प सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सातपूर औद्योगिक वसाहत, एफ सेक्टर मधील कंपन्यांनी त्यांचे सांडपाणी पाईपलाईनद्वारे भवर मळा व धर्माजी कॉलनी नाल्यामध्ये उघडयावर सोडल्याबाबतची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नाशिक महानगरपालिकेने दिनांक २०/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये केली होती.

(३) हे खरे आहे.

(४) • नाशिक महानगरपालिकेकडून दिनांक २०/१२/२०१७ रोजीच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ३२ उद्योगांना भेटी दिल्या असून सदर भेटीदरम्यान ३२ उद्योगांपैकी २९ उद्योगात उत्पादन प्रक्रियेत पाण्याचा वापर करण्यात येत नसल्याचे आढळून आले. उर्वरीत ३ उद्योगांपैकी २ उद्योगांवर त्यांचे उत्पादन बंद करण्याचे निर्देश पारीत करण्यात आले असून एका उद्योगाला उत्पादन बंद का करू नये अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

• अंबड औद्योगिक वसाहतीतील सीईटीपी प्रकल्पास पर्यावरण अनुमती मिळणेबाबतचा प्रस्ताव राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकन समिती - १ (SEAC-१) च्या १४२ व्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आलेला होता. सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तकाकडून पूर्तता अहवाल अद्यापपर्यंत समितीकडे प्राप्त झाला नसल्याने प्रस्ताव प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हादगाव (जि.नांदेड) तालुक्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कामे कागदोपत्री केली असल्याबाबत

**(८) * १०९१६३ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हादगाव (जि.नांदेड) तालुक्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अनेक गावातील शौचालयांची कामे निकृष्ट, अपूर्ण तर काही कामे कागदोपत्री केली असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हादगाव तालुक्यासाठीचे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत रुपये ४ कोटींचे अनुदान थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत हादगांव तालुका, जिल्हा नांदेड येथे पायाभूत सर्वेक्षण २०१२ नुसार एकूण ४२८४३ कुटुंबे होती. त्यापैकी ८८६३ कुटुंबांकडे शौचालये होती, तर ३३९८० कुटुंबांकडे शौचालये नव्हती. हया सर्व ३३९८० कुटुंबांना शौचालये देण्यात आली असून, सदरचे उद्दीष्ट पूर्ण झाले आहे. हादगाव तालुक्यात शौचालय बांधकाम अर्धवट व निकृष्ट झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) नांदेड जिल्हयातील हादगांव तालुक्यात सन २०१७-१८ मध्ये एकूण १६३३९ शौचालये बांधलेली असून त्यापैकी ८३३३ कुटुंबांना शौचालय बांधकाम प्रोत्साहन रक्कम देण्यात आली आहे. उर्वरित ८००६ कुटुंबांनी बांधलेल्या शौचालयांची पडताळणी सुरू असून लाभार्थी कुटुंबांना शौचालय बांधकाम प्रोत्साहन रक्कम देणे बाबतची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बावधन व वाघोली (जि.पुणे) विभागातील महाविद्यालयांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती कॉलेजच्या खात्यात जमा केली असल्याबाबत

**(९) * ११४६२० प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिक मागास विद्यार्थ्यांसाठी शासनाने सुरु केलेली राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती (E.B.C) विद्यार्थ्यांच्या खात्यात न भरता महाविद्यालयांनी स्वतःच्या खात्यात भरल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी विद्यार्थ्यांच्या खात्यावर शुल्क जमा करण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने उक्त शुल्क महाविद्यालयाकडे सुपूर्द करण्यात आले मात्र पुण्यातील बावधन व वाघोली परिसरातील काही नामांकित महाविद्यालयांनी ही शिष्यवृत्ती जमा केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शिष्यवृत्ती (E.B.C) विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच संबंधित दोषी महाविद्यालयावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

दिनांक १३ ऑक्टोबर,२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळी ५० टक्के शैक्षणिक शुल्क संस्थांकडून आकारण्यात आलेले आहे. उर्वरित ५० टक्के शिक्षण शुल्कापोटी शासनाकडून देय असलेली शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित संस्थांना अदा करण्यात आलेली आहे.

(२) नाही.

पुण्यातील बावधन व वाघोली येथील काही संस्थांकडून शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेशाच्यावेळी ५० टक्क्यापेक्षा जास्त शुल्क आकारण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना शासनाकडून देय असणारी ५० टक्के शिष्यवृत्तीची रक्कम संस्थांमार्फत संबंधित विद्यार्थ्यांना अदा करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) पालिका क्षेत्रातील बदलापूर विभाग हायस्कूलमधील आहारामध्ये झालेला गैरव्यवहार

**(१०) * ११३८४३ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) पालिका क्षेत्रातील बदलापूर विभाग हायस्कूल येथे पोषण आहारातील झालेल्या अपहाराची तपासणी करण्याकरिता दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी गेलेल्या तपासणी पथकाला अनेक अनियमितता आढळून आली असून उक्त हायस्कूल मधील मुख्याध्यापक व संचालक मंडळाने शालेय पोषण आहारामध्ये गैरव्यवहार केल्याचे तसेच मुख्याध्यापक यांनी बनावट जात प्रमाणपत्राद्वारे पदोन्नती घेतल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार मुख्याध्यापक व संचालक मंडळावर गैरव्यवहार प्रकरणी व बनावट प्रमाणपत्राद्वारे पदोन्नती घेणाऱ्या मुख्याध्याकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) शालेय पोषण आहार योजनेमध्ये अनियमितता केल्याच्या कारणावरून संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे आदेशित केले आहे.

बनावट जात प्रमाणपत्राद्वारे पदोन्नती घेणाऱ्या मुख्याध्यापक यांना पदानवत करण्यात आले होते. तथापि, मा.न्यायालयाने यास स्थगिती दिली. मा.न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द पुर्नविचार याचिका दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजनेतील (जि.हिंगोली) पहिली ते दहावीचे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

**(११) * ११२५९६ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयामध्ये अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजनेतील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या दहावीपूर्व शिष्यवृत्ती योजनेतील विद्यार्थ्यांचे नुतनीकरण व नवीन विद्यार्थ्यांचे प्रस्ताव शाळा स्तरावर प्रलंबित राहिल्याने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित राहावे लागणार असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रस्ताव शाळास्तरावर प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय.

केंद्र शासनाचे दि. २२/०८/२०१७ च्या पत्रान्वये उत्पन्नाबाबत पालकांचे स्वयंघोषित प्रमाणपत्र न घेता सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला बंधनकारक असल्याचे कळविले आहे. त्यामुळे काही पालकांनी उत्पन्नाचा दाखला वेळेत सादर न केल्यामुळे अशा विद्यार्थ्यांची पडताळणी शाळास्तरावर प्रलंबित राहिलेली आहे. त्यापैकी हिंगोली जिल्हयात शाळास्तरावर नवीन ५५२ व नूतनीकरणाचे ३० असे एकूण ५८२ अर्ज प्रलंबित राहिले आहेत.

(३) व (४) नविन व नूतनीकरणाचे अर्ज शाळा स्तरावर प्रलंबित असल्याबाबत कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे. सदर खुलाशामध्ये मुख्याध्यापकांनी असे नमूद केले आहे की, पालकांनी सहकार्य न केल्यामुळे नवीन विद्यार्थी शाळा स्तरावर प्रलंबित राहिले आहेत व नूतनीकरणाबाबतचे विद्यार्थी शाळा सोडून गेले असल्यामुळे शाळा स्तरावर प्रलंबित राहिले आहेत.

-----------------

## पारस प्रकल्पबाधित क्षेत्रातील (ता.बाळापूर, जि.अकोला) दुषित पाण्यामुळे ग्रामस्थांचा झालेला मृत्यू

**(१२) * १११७५८ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारस प्रकल्पबाधित क्षेत्रातील (ता.बाळापूर, जि.अकोला) दुषित पाण्यामुळे सातरगाव, कोळासा, मनारखेड, मांडोली, पारस, शेळद, भिकुंडखेड व मांडवा गावातील ग्रामस्थांचा मृत्यू झाल्याचे व अनेक ग्रामस्थ किडनीच्या आजाराने त्रस्त असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाकडून आश्वासित केलेला फिल्टरप्लान्ट कोळासा ग्रामपंचायतीला देण्यात आला नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानूसार कोळासा ग्रामपंचायतीसह उक्त गावातील ग्रामस्थांना शुध्द पिण्याचे पाणी मिळण्याकरिता फिल्टरप्लान्ट बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

सन २०१७-१८ या कालावधीत पारस प्रकल्पबाधित क्षेत्रातील सातरगाव, कोळासा, मनारखेड, मांडोली, पारस, शेळद, भिकुंडखेड व मांडवा या ८ गावातील ८५ पाणी नमुन्यांची रासायनिक तपासणी करण्यात आली त्यापैकी २८ पाणी नमुने पिण्यास योग्य व ५७ पाणी नमुने पिण्यास अयोग्य असल्याचे आढळून आले आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडून प्राप्त अहवालानुसार संबंधित गावातील ग्रामस्थांचा दूषित पाण्यामुळे मृत्यु झाल्याचा वा ग्रामस्थ किडनीच्या आजाराने त्रस्त असल्याचे आढळून आले नाहीत.

(२) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, मर्यादीत यांचेकडून ग्रामपंचायत कोळासा येथे जलशुद्धीकरण यंत्र बसविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) जिल्ह्यातील दूषित पाणी आढळलेल्या गावांमध्ये जलशुद्धीकरण यंत्रणा बसविण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रू. ८९.५१ लक्ष ची तरतूद मंजूर करण्यात आली असून त्याअंतर्गत १६ जलशुद्धीकरण यंत्रे बसविण्याचे प्रस्तावित आहेत. तसेच शासन स्तरावरून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (पाणी गुणवत्ता बाधित) अंतर्गत २० जलशुद्धीकरण यंत्रे बसविण्यात आली असून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (पाणी गुणवत्ता बाधित) टप्पा-२ अंतर्गत १७ जलशुद्धीकरण यंत्रे बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दहावीच्या नव्या अभ्यासक्रमाची विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग १ आणि २ ची बालभारतीमार्फत पुस्तके प्रकाशनापूर्वीच व्हॉटासअ‍ॅपवर व्हायरल झाल्याबाबत

**(१३) * ११३३५२ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दहावीचा सन २०१८-१९ या शैक्षणिक सत्रापासून अभ्यासक्रम बदलणार असल्याने या नव्या अभ्यासक्रमाची पुस्तके तयार करण्याची जबाबदारी शासनाने बालभारतीवर सोपविलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्या अभ्यासक्रमाची विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग १ आणि २ ची बालभारती मार्फत तयार करण्यात आलेली पुस्तके प्रकाशना पूर्वीच दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी रात्री व्हॉटसॲपवर व्हायरल झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पुस्तकाची छपाई शिल्लक असतानाच पुस्तके व्हाटसॲपवर आल्यामुळे बालभारतीच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत साशंकता निर्माण झाली असून गाईड निर्मिती करणाऱ्या कपंन्यांचे मंडळांत काम करणाऱ्या लोकांशी संगनमत असल्यामुळे असा गैरप्रकार झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) पाठयपुस्तक निर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर विशेषाधिकाऱ्यांमार्फत नियंत्रण ठेवून व गोपनियता राखून कार्यवाही करण्यात येते.
(४) सदर प्रकरणाबाबत दादर पोलीस ठाणे अंतर्गत सायबर क्राईम विभागाकडे गुन्हा दाखल केला असून त्यांच्यामार्फत तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरगांव, ताकारी, साखराळे, ढवळी, येलूर, गाताडवाडी, ठाणापुडे, मरळनाथपूर (ता.वाळवा, जि.सांगली) या गावातील पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(१४) * ११४४७९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरगांव, ताकारी, साखराळे, ढवळी, येलूर, गाताडवाडी, ठाणापुडे, मरळनाथपूर (ता.वाळवा, जि.सांगली) या गावातील पाणीपुरवठा योजनांना सन २०१४-१५ मध्ये वा त्या दरम्यान मंजूरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पूर्ण करण्याऐवजी शासनाने सदर योजनाच बंद केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर योजना बंद असल्यामुळे तेथील जनतेला शेतीच्या व पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व बंद असलेली योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

मौ. बोरगाव, ताकारी, साखराळे, ढवळी, येलूर, गाताडवाडी, ठाणापुडे, मरळनाथपूर (ता.वाळवा, जि.सांगली) या गावातील पाणीपुरवठा योजनांचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१५-१६ च्या कृती आराखड्यात समावेश होता. परंतु केंद्र शासनाने नवीन योजनांची कामे हाती घेऊ नयेत अशा सूचना दिल्याने पुढील कार्यवाही करण्यात आली नाही.
(३) हे खरे नाही.

सदर गावांना अस्तित्वातील स्त्रोतातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरु आहे. तसेच सदर योजना या केवळ पिण्याच्या पाणीपुरवठ्याकरिता असल्याने शेतीच्या पाण्यासाठी जनतेला त्रास होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) उपरोक्त ०८ गावांच्या पाणीपुरवठा योजनांचा विभागाच्या दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समावेश करण्यात आला आहे. सद्यस्थितीत मौ साखराळे, बोरगाव व ढवळी वगळता उर्वरित ५ गावांच्या पाणीपुरवठा योजनांना मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी ३ गावांच्या योजनांची कामे सुरु करण्यात आली असून २ गावांच्या कामांची निविदा कार्यवाही अंतिम टप्यात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ९२ गावातील पाण्याचे नमुने दूषित आढळल्याबाबत

**(१५) * ११३७२० श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हापरिषदेच्या आरोग्य विभागाने सन २०१६-१७ मध्ये पिण्याच्या पाण्याच्या केलेल्या तपासणीमध्ये चंदगड तालुक्यातील ९२ गावातील पाण्याचे नमुने दूषित आढळल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार उपरोक्त गावांना शुध्द पाणी पुरवठा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

चंदगड तालुक्यामध्ये ११० गावे १६३ वाड्या वस्त्या असून या सर्व गावे/वाड्या वस्त्यांच्या २८३ पाणी पुरवठा उद्भवांचे वेळोवेळी सर्वेक्षण करून सन एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ मध्ये एकूण १३८९ पाणी नमुन्यांची जैविक तपासणी करण्यात आली. त्यापैकी १५२ उद्भवांचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल उपविभागीय प्रयोगशाळा गडहिंग्लज यांचेकडून प्राप्त झाला आहे.

(२) उपविभागीय प्रयोगशाळा गडहिंग्लज यांचेकडून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पंचायत समिती चंदगड येथील आरोग्य विभागाकडून तातडीने सदर १५२ दुषित पाणी उद्भवांचे निर्जंतूकीकरण करून फेरतपासणी करण्यात आली व त्यानुसार सदरचे नमुने पिण्यास योग्य असल्याचा अहवाल उपविभागीय प्रयोगशाळा गडहिंग्लज यांचेकडून प्राप्त झाला आहे.

चंदगड तालुक्यातील ६ प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत साथ परिस्थिती उद्भवू नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना ग्रामीण भागामध्ये नियमित राबविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील खासगी शाळांमध्ये आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांना पहील्या वर्गात प्रवेश मिळाला नसल्याबाबत

**(१६) * १०८६७२ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासगी शाळांमध्ये आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांना पहील्या वर्गात प्रवेश मिळण्याकरीता १ लक्ष १९ हजार ८७६ राखीव असलेल्या जागांपैकी ५६ हजार ५७९ राखीव जागा भरल्या नसल्याबाबतची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०१७-१८ मध्ये ८ हजार ३०३ शाळांमधुन १ लक्ष १९ हजार ८७६ जागा गरीबांच्या मुलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या असुन त्यांना प्रवेश देण्यासाठी शिक्षण विभागाने ऑनलाईन प्रक्रिया राबविली असूनही ५६ हजार ५७९ जागावर गरजू विद्यार्थ्यांना अद्यापही प्रवेश देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गरीब मुलांसाठी राखीव असलेल्या ५६ हजार ५७९ जागांवर खासगी शैक्षणीक संस्थेनी अधिक उत्पन्न गटातील मुलांना प्रवेश दिल्यानंतरही प्रवेशाचे शुल्क शासनास अदा करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त खासगी शैक्षणीक संस्थेकडून प्रवेश शुल्क वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात आरटीई २५ टक्के प्रवेशाच्या एकूण १,२०,८२२ जागांपैकी ६३९६९ जागांवर विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश घेतला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात "पॉस" मशीन या ऑनलाईन तंत्राच्या वापरामध्ये त्रुटी आढळून आल्याबाबत

**(१७) * ११०७६४ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनमान्य धान्य दुकानातून स्वस्त दरात शिधापत्रिका धारकांना धान्य मिळावे व धान्याचा काळाबाजार व गैरव्यवहार थांबावा तसेच नियोजित व नियमित धान्य पुरवठा व्हावा व धान्य वितरणांची नोंद व्हावी यासाठी शासनाने “पॉस” मशीन या ऑनलाईन तंत्राचा वापर सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ग्रामीण भागात पुरेसे नेटवर्क मिळत नसल्याने “पॉस” मशीन यंत्रणा ठप्प झाली असून तसेच ग्राहकांच्या बोटांचे ठसे जुळत नसल्याने शिधापत्रिकाधारकांची नोंद झाल्याशिवाय धान्य वितरण करता येत नसल्याचे कारण देऊन धान्याचा पुरेसा साठा उपलब्ध असतांनाही स्वस्त धान्य दुकानदार शिधापत्रिका धारकांना धान्य वितरीत करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रत्नागिरी जिल्हयात शासनमान्य रेशन दुकानदारांना पॉस मशीनचा वापर सक्तीचा केला असून सदर पॉस मशीनचे सॉफ्टवेअर अदययावत करताना अनेक त्रुटी आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर त्रुटी दूर करण्याबाबत जिल्हयातील रेशन दुकानदारांकडून शासनाकडे वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत असल्याने शासनाने याबाबत कोणती पर्यायी उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पात्र लाभार्थी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ या योजनेच्या लाभापासून वंचित होणार नाही याची काळजी घेण्याच्या मार्गदर्शक सूचना शासनाने सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दि.१७ एप्रिल २०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या आहेत.

(३) पॉस मशीनचे सॉफ्टवेअर अद्यावत करताना त्रुटी उद्भवल्यास त्याचे वेळीच निराकरण करण्यात येते.

(४) रास्तभाव दुकानदारांकडून पॉस मशीनमधील त्रुटी दूर करण्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(५) अशी घटना निदर्शनास आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना प्रलंबित असल्याबाबत

**(१८) * १०८५८६ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना स्वच्छ आणि शुद्ध पाणी मिळावे या उद्देशाने शासनाकडून गाव, वाडी, वस्त्यांसाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हयातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत ८८ योजनांची कामे सन २०१७-१८ च्या कृती आराखड्यानुसार मंजूर झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या ८८ योजनांपैकी ३० योजना प्रलंबित असून फक्त ४ योजनांतून प्रत्यक्षात पाणी पुरवठा सुरू करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनांची कामेदेखील प्रतीक्षेत असून सदर योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार उपरोक्त दोन्ही योजनांची कामे पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत प्रगतीपथावरील ८१ योजनांचा सन २०१७-१८ च्या कृती आराखडयामध्ये समावेश आहे.

(३) अशंत: खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत प्रगतीपथावरील ८१ योजनांपैकी २० योजनांव्दारे २६ गावे/वाडी/तांडयांना पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(४) व (५) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील ३९ योजनांचा समावेश असून त्यातील १७ योजनांच्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. ९ योजनांची अंदाजपत्रके तांत्रिक समितीसमोर सादर करण्यात आली आहेत. १ योजनेस तांत्रिक समितीची मान्यता देण्यात आली आहे. २ योजना जल स्वराज्य टप्पा-२ अंतर्गत व १ योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत करण्यात येत आहे. १ योजनेच्या उद्भवाबाबत भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेस प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. ५ योजनांची अंदाजपत्रके तयार करण्याची कामे चालू असून, ३ योजना पुर्ण व्यवहार्यता अहवालानुसार अव्यवहार्य असल्याने वगळण्यात आल्या आहेत.

-----------------

## मराठवाडयातील १३६ पाणी पुरवठा योजनामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) * ११०२१८ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील १३६ पाणी पुरवठा योजनामध्ये गैरव्यवहार झाल्याचे विभागीय बैठकीत दिलेल्या अहवालात नमूद करण्यात आले असून त्यामध्ये

औरंगाबाद २३, परभणी ६०, नांदेड ६, उस्मानाबाद २, बीड ४४ व लातूर १ अशी जिल्हानिहाय स्थिती असून यामध्ये रुपये ११.१२ कोटीची रक्कमही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहार झालेल्या रक्कमेपैकी केवळ ७० लाख रूपये वसूल झाले असून अद्यापी ६९ प्रकरणात चौकशी सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सर्व संबंधितांविरोधात कारवाई करण्याबाबत तसेच गैरव्यवहाराची संपूर्ण रक्कम विनाविलंब वसूल होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

या १३६ पाणी पुरवठा योजनांमध्ये रु. ११.६६ कोटी इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे निर्दशनास आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

अपहाराच्या रकमेतील रु.५१.७९ लक्ष रकमेची वसूली झालेली आहे. एफ.आय.आर. नोंदणी केलेल्या योजना ३१, न्यायप्रविष्ट योजना ४, आर.आर.सी. साठी कार्यवाही केलेल्या योजना ६ व एफ.आय.आर. नोंदणी बाकी असलेल्या योजना २७ अशा ६८ योजनांबाबत कार्यवाही चालू आहे.

(३) व (४) संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडून प्रलंबीत कामे करुन घेणे, पोलीसात गुन्हा नोंदविणे व आर.आर.सी. ची कार्यवाही करुन संबंधितांच्या ७/१२ वर बोजा चढविणे अशा प्रकारची कार्यवाही चालू आहे.

-----------------

## लातूर जिल्हयात पाण्याचे नमुने दूषित आढळल्याबाबत

**(२०) * ११३१०८ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा),**

**कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या ९ महिन्यांच्या पाणी नमुने अहवालानुसार १५२२ स्त्रोत रासायनिक पाणी नमुने तपासणीत दिनांक १ एप्रिल, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या सुमारास दूषित असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानवी आरोग्यास घातक असणारे अनेक आजार रासायनिक घटकयुक्त पाणी प्यायल्यामुळे होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे आहे.

वरिष्ठ भू-वैज्ञानिक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,लातूर यांच्या मार्फत प्राप्त झालेल्या अहवालानुसार लातूर जिल्हयात माहे १ एप्रिल २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत एकूण ३८५७ रासायनिक पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यांपैकी १५२२ पाणी नमुने रासायनिक दृष्ट्या दूषित आढळले असून त्यापैकी १२११ नमुन्यांमध्ये नायट्रेट, १८ नमुन्यांमध्ये फ्लोराईड व १२८ नमुन्यांमध्ये आयर्न कमाल मर्यादेपेक्षा अधिक आढळून आले आहे.

(३) जिल्हास्तरावर दरमहा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली होण्याऱ्या बैठकीमध्ये रासायनिक घटक कमाल मर्यादपेक्षा अधिक आढळून आलेल्या पाणी नमुन्यांची माहिती संबंधित आरोग्य विभाग, पाणी पुरवठा पुरवठा विभाग व संबंधित गट विकास अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली जाते.

तसेच भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेमार्फत संबंधित विभागावार तात्काळ माहिती कळविण्यात आली आहे व रासायनिक दृष्ट्या दूषित स्त्रोतांचे पाणी पिण्यास बंद करण्यात येऊन पर्यायी स्त्रोत उपलब्ध करून देण्यात आलेले

आहेत. फ्लोराईड कमाल मर्यादेपेक्षा अधिक आढळून आलेले स्त्रोत लाल रंगाने रंगवून पाणी पिण्यास अयोग्य असे फलक स्त्रोतांजवळ लावण्यात आलेले असून गावात शुद्ध व सुरक्षित पाणी पुरवठा बाबत जनजागृती करण्यात आलेली आहे.

ग्रामसेवक व जलसुरक्षक यांच्या द्वारे सर्व स्त्रोतांचे निर्जंतुकीकरण व स्त्रोतांचे परिसर स्वच्छ करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या सातवी आणि नववीच्या पुस्तकांमध्ये चुकांसह २ सदोष नकाशे आढळल्याबाबत

**(२१) * १०४७४८ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या वर्ग ७ वी या वर्गाचे इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल तसेच वर्ग ९ वी वर्गाचे इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र या पाठयपुस्तकांचे अवलोकन केले असता चुकांसह २ सदोष नकाशे आढळल्याची बाब सटाना येथील माजी प्राचार्य के.यू. सोनावणे यांनी मा.मुख्यमंत्री व मा.शिक्षण मंत्री यांच्याकडे तक्रारीद्वारे निदर्शनास आणली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ अभ्यासक्रम व त्या संदर्भातील पुस्तकात बदल करण्याचा निर्णय घेतांना त्यांची कोणतीही पूर्वतयारी न केल्याने मेट्रो सिटी सोडली तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सदरची पुस्तके शाळा सुरु झाल्यापासून दोन ते तीन महिने होऊनही उपलब्ध झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्याअनुषंगाने चुका दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) इ.९ वी च्या इतिहास, राज्यशास्त्र आणि भुगोल या पाठ्यपुस्तकातील चुका शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या पुनर्मुद्रित प्रतीत दुरुस्त करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलडाणा जिल्ह्यातील शिधापत्रिका आधारला जोडण्यासाठी प्राप्त झालेल्या निधीत गैरप्रकार झाल्याबाबत

**(२२) * १०९४५० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील नागरिकांच्या शिधापित्रका आधारला जोडणी करण्यासाठी प्राप्त झालेला निधी काम पूर्ण न करता खर्च करण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलडाणा जिल्ह्यात माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत शिधापत्रिका आधारला जोडणी करण्याचे काम झाले आहे काय तसेच सदर कामासाठी किती निधी प्राप्त झाला व त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

शिधापत्रिकांच्या डाटाबेसमध्ये लाभार्थ्याचा आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक व मोबाईल क्रमांक समाविष्ट करण्यासाठी व डाटाबेसमध्ये आवश्यक दुरूस्त्या करून सर्व शिधापत्रिकांचा डाटा छपाईकरिता अंतिम करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांना निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(२) (i) बुलढाणा जिल्ह्यात माहे जून, २०१५ मध्ये निविदा प्रसिध्दीवेळी ऑनलाईन शिधापत्रिकांची संख्या ४,९९,३५८ होती व मार्च २०१७ मध्ये ५,५२,५५१ कार्यरत शिधापत्रिका आहेत. एकूण संगणकीकृत शिधापत्रिकांपैकी आता ४,९९,९१३ शिधापत्रिकांमध्ये आधार सिडींग करण्यात आलेले आहे.

(ii) जिल्हा कार्यालयाला दिलेला एकूण रू.२६ लाख एवढा निधी सन २०१५ ते २०१७ या कालावधीमध्ये शिधापत्रिकांचा डाटा अंतिम करणेकामी खर्च करण्यात आलेला आहे.

(iii) नवीन शिधापत्रिका वितरीत करणे, विभक्त शिधापत्रिका देणे ही अविरत चालणारी प्रक्रिया असल्याने आता उर्वरित शिधापत्रिकांचा डाटा अद्यावत करून अंतिम करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खानापूर, आटपाडी व कवठेमहांकाळ (जि.सांगली) तालुक्यातील अंत्योदय लाभार्थी योजनेपासून २० हजार नागरिक वंचित असल्याबाबत

**(२३) * १०८४०९ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर, आटपाडी व कवठेमहांकाळ (जि.सांगली) तालुक्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब गटासाठीचे लाभार्थी योजनेपासून २० हजार नागरिक वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील कार्डधारकांना धान्य न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले आहे त्यानुसार या कार्डधारकांना तातडीने धान्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) व (३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत शहरी भागातील रु.५९,०००/- व ग्रामीण भागातील रु.४४,०००/- कमाल वार्षिक उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. राज्यामध्ये सध्या शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम सुरु असून, सदर काम बहुतांश पूर्ण झालेले आहे. शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचा निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर अपात्र शिधापत्रिकाधारकांची लाभार्थी म्हणून नोंद होणार नसल्याने ते आपोआप रद्द होतील आणि त्यामुळे प्राप्त झालेल्या इष्टांकानुसार नवीन पात्र लाभार्थ्यांचा योजनेत समावेश करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापूर दापोली, मंडणगड, खेड (जि.रत्नागिरी) मुदखेड (जि.नांदेड)येथील प्राथमिक शाळांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराबाबत

**(२४) * १०६०९६ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.संजय कदम (दापोली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोषण आहारातून मुलांना उत्तम आहार मिळावा तसेच शाळेत येण्याविषयी गोडी वाढावी या उदात्त हेतूने पोषण आहार योजना सुरु करण्यात आली असून या योजनेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामगाराचा दर्जा असूनही त्यांना कामगारांचा कोणताही लाभ मिळत नसून मानधनासाठी ३ ते ४ महिने वाट पहावी लागत असल्याने त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्याय, राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये पोषण आहार शिजवून देणाऱ्या स्वयंपाकीना गत ४ महिन्यापासूनचे मानधन मिळाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शासनाने शालेय विद्यार्थ्यांना माध्यान्ह आहार देण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार रत्नागिरी जिल्हयात शालेय पोषण आहार योजनेकरिता ठेकेदारांची नियुक्ती प्रकिया अदयापि झाली नसल्याने धान्य व धान्यादी मालाचा पुरवठा शाळांना झाला नाही परिणामी शिक्षकांना अनेक अडचणींना समोर जावे लागत असून आहार बंद झाल्याने तेथिल विद्यार्थीना आहार दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच दापोली, मंडणगड, खेड (जि.रत्नागिरी) या तालुक्यात शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत दि. महाराष्ट्र स्टेट को. ऑ. कन्झ्युमर फेडरेशन लि. मुंबई या कंपनीच्या ठेकेदारामार्फत पुरवठा केले जाणारे धान्य अतिशय निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच मुदखेड (जि.नांदेड) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या अनेक प्राथमिक शाळेत तांदूळ पुरवठा होत नसल्यामुळे कांही दिवसांपासून खिचडी शिजत नसल्याने मध्यान्ह भोजन योजना असफल ठरली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यासउक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३), (४) व (५) हे खरे नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर, मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम प्रभावीपणे राबविणेबाबत

**(२५) * ११०९०३ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील नागरिकांना शुध्द पिण्याचे पाणी मिळण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यकम प्रभावीपणे राबविणेसाठी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी सोलापूर जिल्हयास रुपये २८ कोटी निधी दिल्याची घोषणा दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या सुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयातील पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघातील शासनाच्या पाणी पुरवठा विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना अद्यापही निधी अभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, सदर योजनेस निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) विभागाच्या दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीत मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्हयात रु.३३.६२ कोटी इतक्या किंमतीच्या ३३ नळ पाणीपुरवठा योजना नव्याने राबविण्याचे प्रस्तावित आहे.

सद्य:स्थितीत सदर कार्यक्रमांतर्गत रु.१५.४० कोटी इतक्या किंमतीच्या ११ नवीन पाणीपुरवठा योजनांना मंजूरी देण्यात आली आहे. सदर ११ योजनांच्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या असून कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकलोली (जि.ठाणे) येथे सर्वशिक्षा अभियानांतर्गत बांधण्यात येत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(२६) * १०४७९६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील वज्रेश्वरी नजीकच्या अकलोली येथे सर्वशिक्षा अभियाना अंतर्गत पंचायत समितीच्या माध्यमातून सन २००८ मध्ये शाळेची इमारत बांधण्यात आली असून सदर इमारत कमकूवत असल्याचे कारण देवून पुन्हा त्याठीकाणी १६ लाख रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास ग्रामस्थांनी निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आले व त्यानुसार दोषी कंत्राटदारावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हयातील पाण्याची पातळी खालावली असल्याबाबत

**(२७) * ११३१२२ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात परराज्यातील बोअर मशिन आणून महिन्याला जवळपास दीड हजार बोअर पाडल्याने जमिन खराब होत असून पाण्याची पातळीही खाली जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूजल अधिनियमानुसार मशीनची नोंदणी करणे बंधनकारक असूनसुध्दा एकाही बोअर मशीनची नोंदणी झाली नाही तसेच परराज्यांतील अनेक भागात बोअर घेण्यास बंदी घातलेली असल्याने तेथील मशीन उपरोक्त जिल्हयात आणल्या असून त्यावर कोणाचेही नियंत्रण नाही, हे ही खरे आहे काय,

(३) उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत राज्यात निश्चित करण्यात आलेल्या ३९२० निरिक्षण विहिरींच्या भूजल पातळीची नोंद माहे सप्टेंबर, जानेवारी, मार्च व मे महिन्यात घेण्यात येते. लातूर जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर, २०१७ अखेर पडलेले पर्जन्यमान व त्यामधील २०% पेक्षा जास्त तूट लक्षात घेता, निरिक्षण विहिरींतील पाणी पातळी मागील ५ वर्षातील सप्टेंबर महिन्याच्या सरासरीशी तुलनात्मकरित्या तपासली असता ती, जिल्हयातील १० तालुक्यांपैकी दोन तालुक्यांमध्ये १ ते २ मीटरने, अन्य दोन तालुक्यांत २-३ मीटर ने कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. पाणी पातळीमध्ये ३ मीटर पेक्षा अधिक घट असल्याचे एका तालुक्यात निदर्शनास आले आहे.

(२) राज्यात महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९, दि.०१.०६.२०१४ पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमातील कलम १२ अन्वये राज्यातील खोदकाम यंत्रसामुग्री मालक व ते चालवणारे यांची नोंद करावयाची आहे. उक्त अधिनियमातील कलमांची अंमलबजावणी करण्यासाठी अधिनियमांतर्गत नियम तयार करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून अधिनियमांतर्गत नियम अंतिम झाल्यानंतर राज्यातील खोदकाम यंत्रसामुग्री मालक व ते चालवणारे यांच्या नोंदणीची कार्यवाही सुरु होईल तसेच बेकायदेशीररित्या बोअर घेणाऱ्या यंत्रसामुग्रीवर नियंत्रण आणता येईल.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जामोद संग्रामपूर तालुक्यातील ई निवीदा प्रक्रियेत झालेल्या गैरप्रकाराबाबत

**(२८) * १११४७३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्ह्यातील जळगांव (जामोद) व संग्रामपूर, तालुक्यातील विविध कामाकरीता वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण यंत्रणा, बुलडाणा यांनी ई निवीदा प्रक्रियेत गैर प्रकार केल्याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने अतिरिक्त संचालक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा पुणे यांचेमार्फत चौकशी सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने अतिरिक्त संचालक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा पुणे यांच्यामार्फत सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास त्यात काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने ई निवीदा प्रक्रियेत गैर प्रकार करणाऱ्या संबंधीतांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीतील मुद्यांच्या अनुषंगाने अतिरिक्त संचालक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ओणी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील १२ वाड्यांतील पाणी टंचाईबाबत

**(२९) * ११३६०९ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओणी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) या मुंबई-गोवा महामार्गावरील गावातील १२ वाडयांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओणी गावामध्ये १२ वाडया असून जवळपास ३०० कुटुंबे वास्तव्यास असून ओणी ग्रामपंचायतीच्या नळपाणी योजनेशिवाय ओणी स्टॅण्ड परिसरातील ग्रामस्थांना अन्य पर्याय उपलब्ध नसल्यामुळे पाणी टंचाई भासू लागल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या महिनाभरापासून सदर गावात दोन-तीन दिवसातून एकदा पाणी येत असल्याने तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे तसेच सद्य:स्थितीतील ग्रामपंचायतीच्या नळपाणी योजनेला पुरेसा विद्युतभार मिळत नसल्याने नळपाणी योजनाही बंद पडली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
तथापि, तांत्रिक कारणामुळे पाणी पुरवठा अनियमित होता.

(३) व (४) माहे जानेवारी, २०१८ मध्ये सदर योजनेला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून तांत्रिक कारणामुळे पुरेसा विद्युत भार मिळत नसल्याने पाणी पुरवठा अनियमित होत होता. तथापि, दिनांक २९.०१.२०१८ पासून योजनेला विद्युतभार व्यवस्थित मिळत असून पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.